# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२१-२३** **दिनांक :- १२/०७/२०२३**

**मोबाईल स्नॅचिंग करणाऱ्या अरोपीतांस अटक करुन मुददेमाल हस्तगत नायगाव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.**

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०८/०७/२०२३ रोजी पहाटे ०४.५० वा दरम्यान मुंबई-अहमदाबाद हायवे वरील अहमदाबाद वाहिनीवर बापाने ब्रीज पासुन अंदाजे १०० मिटर रोडच्या लगत, बाफाणे ता. वसई जि. पालघर येथे फिर्यादी नैसर्गिक विधी करण्याकरिता ट्रक मधून उतरुन रोडच्या कडेला जात असताना पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एम.एच.०२ ए.ई.८५६५ वरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीच्या हातातील रिअलमी कंपनीचा मोबाईल फिर्यादीच्या संमतिशिवाय लबाडीच्या इराद्याने स्वत:च्या फायद्याकरीता जबरीने खेचुन पळुन गेल्याबाबत फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने अनोळखी आरोपीतांविरुध्द नायगाव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. I १८७/२०२३ भां.दं.वि.सं. कलम ३९२,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वेगवेगळे पथके बनवुन सदर मोटार सायकल क्रमांक एम.एच.०२ ए.ई.८५६५ हीचा शोध घेत असताना तांत्रिक विश्लेषन व गुप्तबातमीदारामार्फत प्राप्त माहितीचे आधारे चिंचोटी परिसरातुन आरोपीत नामे १) सुरज रंगीलाल चौव्हाण, रा. वाकीपाडा, नायगाव पुर्व नायगाव, पुर्व ता. वसई जि. पालघर, २) नितीन सिताराम थोरात, वय-२६ वर्षे रा. चिचोंटी, नायगाव पुर्व ता. वसई जि. पालघर यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने कौशल्यपुर्ण तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करुन त्यांच्याकडुन जबरी चोरी केलेला गुन्हयातील मोबाईल व इतर ०४ मोबाईल तसेच सदर गुन्हा करतेवेळी वापरण्यात आलेली मोटारसायकल अशा एकुण ८५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पो.उप.नि. सी. आर. पाटील हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्रीमती पौणिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पो.नि. श्री. मिलींद साबळे (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. संतोष सांगवीकर, रोशन देवरे, पो.हवा. देविदास पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, अझर मस्ते, सोमीनाथ बोडके यांनी केली आहे.

----0000----